**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

# प्रेसनोट दिनांक – १६/०५/२०२४

**दि. १५/०५/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण ३३५/२०२४ भा द वि का क३०७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. १५/०५/२०२४ रोजी पहाटे ०३:३० वा. चे सुमारास जिल्हा परिषद शाळेजवळ नाणेकरवाडी, चाकण, ता. खेड, जि. पुणे, येथे राहते घरामध्ये |
| गुन्हा दाखल | :- | दि.१५/०५/२०२४ रोजी १५/३४ वा |
| फिर्यादी | :- | गजानन पोमा चव्हाण, वय २८ वर्षे, व्यवसाय मजुरी, जिल्हा परिषद शाळेजवळ नाणेकरवाडी, चाकण, ता. खेड, जि. पुणे, मुळगाव रा. हारजु तांडा, मंग्याळ, ता. मुखेड, जि.नांदेड |
| आरोपी | :- | विश्वभंर हारजु आडे, वय ३६ वर्षे रा. जिल्हा परिषद शाळेजवळ, नाणेकरवाडी, चाकण, ता. खेड, जि. पुणे, **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची बहिण हिला चारित्र्याच्या संशयावरुन तीचे राहते घरी आरोपी यांनी जिवे ठार मारण्याचे उद्देशाने लोखंडी हातोडयाने फिर्यादीचे बहिणीचे डावे डोळयावर, डावे बाजुचे कानावर गंभीर मारहाण करुन जखमी करुन पळुन गेला आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि मोरखंडे ९९२१११८१०० |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ६४५/२०२४ भा.द.वि. कलम ३२६,३२३,५०४,३४ प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१४/०५/२०२४ रोजी २२/०० वा चे सुमा.पाण्याची टाकीजवळ नेरे दत्तवाडी, ता. मुळशी जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१५/०५/२०२४ रोजी ०५.१४ वा |
| फिर्यादी | :- | गणेश भिमराव वायकर वय- २१ वर्षे धंदा- ड्रायव्हर, रा. पाण्याचे टाकीजवळ, नेरे दत्तवाडी ता. मुळशी जि. पुणे |
| आरोपी | :- | १)तय्युब बाबु शेख वय ३५ वर्षे रा. नेरे दत्तवाडी ता. मुळशी जि. पुणे<br>२) बाबु मेहबुब शेख वय ६० वर्षे. रा.सदर<br>**आरोपी क्र १ व २ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा वाढदिवस असल्याने फिर्यादीचे घरी फिर्यादीचे दाजी रवी जाधव, मामा सचिन कुंभार, मित्र कृष्णा मोरे असे जेवण करीत असताना घराच्या पत्र्यावर कोणीतरी दगड फेकत असल्याने सर्वजण बाहेर जावुन पाहिले असता आरोपी क्र.१ हा दगड मारुन पळुन घरी गेला त्यास दगड पत्र्यावर का मारत आहेस याबाबत विचारपुस करण्यासाठी त्याच्या घरी गेले असता आरोपी क्र.१ यांने बाहेर येवुन फिर्यादी यांस शिवीगाळ करुन त्याच्या हातातील गजाने फिर्यादीचे डोक्यात मारल्याने रक्त निघत होते. म्हणुन फिर्यादीचे मामा त्यास धरण्यास गेले असता त्यावेळी त्यांच्याही डोक्यात गज मारुन त्यांनाही जखमी केले. त्यावेळी भांडणे सोडविण्यासाठी फिर्यादीचा मित्र कृष्णा मोरे गेला असता आरोपी क्र.२ याने प्लॅस्टिकच्या पाईपने त्याच्या डाव्या हातावर मारल्याने कृष्णा मोरे यास मुक्का मार लागला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि झोल ८२७५३८७४७७ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी २०९/२०२४, भा.द.वी.कलम ३२४,३२३, ५०४,३४ अन्वये |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१४/०५/२०२४ रोजी १९/३० वा.चे सुमा.एस.एस.वॉशिंग सेटर लक्ष्मीनगर गल्ली नं. १ साठफुटी रोड पिंपळे गुरव पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१५/०५/२०२४ रोजी ४/१७ वा |
| फिर्यादी | :- | अनुप अजय सिंग वय. २३ वर्षे धंदा व्यवसाय रा. भाकरे निवास शास्त्रीनगर जवळ कासारवाडी भोसरी पुणे |
| आरोपी | :- | १)ॲलेक्स व<br>२)कृष्णा<br>३)त्यांचे दोन मित्र पुर्ण नाव पत्ता महित नाही<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी त्यांची गाडी वॉश करायला लावून बसले असता सदर ठिकाणी आरोपी क्र १ , २ व त्यांचे दोन मित्र आले त्यावेळी त्यांचे कडे साक्षीदार सोहेल शेख याने त्यांचेकडे उधारीचे पैसे मागितले असता त्यांनी साक्षीदार सोहेल याला शिवीगाळ करुन हाताने मारहाण करु लागले तेंव्ही फिर्यादी भांडणे सोडविण्या करीता गेले असता आरोपी क्र १ याने फिर्यादी यांना शिवीगाळ करुन त्याचे डाव्या हातावर काठी मारुन जखमी केले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि गावंडे ९०२८०४३३२६ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ६१३/२०२४ भा.दं.वि कलम २७९,३३७, ३०४(अ) मोटार वाहन कायदा कलम १८४,११९/ ११७, |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१४/०५/२०२४ रोजी १८/०० वा ते १८/३० वा.चे सुमा. एम्पायर इस्टेट कडुन एम एम चौकाकडे येणारे रोडवरुन रागा पॅलेस हॉटेल जवळ बीआरटी रोडमध्ये काळेवाडी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१५/०५/२०२४ रोजी १८.२८ वा |
| फिर्यादी | :- | रविंद्र मुरलीधर सुतार वय ४८ वर्ष धंदा नोकरी रा. गल्ली नंबर २ गांगर्डेनगर पिंपळे गुरव पुणे |
| आरोपी | :- | अब्दुल रहीम खान वय २२ वर्ष रा.गल्ली नंबर ४ पवनानगर काळेवाडी पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणाहुन फिर्यादी यांचे सासरे रघुनाथ बाबुराव पंडीत वय ७५ वर्ष रा. सर्व्हे नं.९७/१अ/१ मोरया कॉलनी नढे कॉर्नर विजयनगर बसस्टॉप जवळ काळेवाडी पुणे हे पायी वॉकींग करत असताना नमुद आरोपी याने आपले ताब्यातील होंडा मोटार सायकल नंबर एम एच ०१ सी एन ५९७९ ही भरघाव वेगाने रहादारीचे नियमाकडे दुर्लक्ष करुन हयगयीने चालवुन फिर्यादी यांचे सासरे रघुनाथ पंडीत यांना जोरात धडक देवुन त्यांचे डोक्यास, उजवे हातास जबर जखमी करुन त्यांचे मृत्युस कारणीभुत होवुन स्वताचे जीवीतास धोका निर्माण करुन जखमी करणेस कारणीभुत झाला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि मेटे ९४०५१२११५३ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी २११/२०२४, भा.द.वि. कलम ४२०, ४०६,३४, माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००८ चे कलम ६६(डी) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०४/०५/२०२४ रोजी १०/१८ ते दि. ०५/०५/२०२४ रोजीपर्यंत मोबाईल फोन टेलिग्राम वरुन |
| गुन्हा दाखल | :- | दि.१५/०५/२०२४ रोजी १९/२० वा |
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी धंदा ॲडव्होकेट रा. एस ४५ सुर्यमुखी गणपती मंदीराजवळ काशीदनगर पिंपळे गुरव पुणे. |
| आरोपी | :- | १)मोबाईल नंबर ९३२४६८८०७६ वरुन व्हॉट्सअप द्वारे बोलणारा EL Connect pvt Ltd कंपनीचा माणुस, २)https://t.me/sharmakiaraofficialटेलिग्राम द्वारे बोलणारी महिला आरोपी व @walker६९७० या लिंकवरील टेलिग्राम युझर टिचर **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी व्हॉट्सअप द्वारे बोलणारा EL Connect pvt Ltd कंपनीचा इसम यांने फिर्यादी यांना लिंक पाठवुन सदर लिंकवरुन टेलिग्राम ला जॉईन होवुन आरोपी क्र २ हिने प्रिपेड टास्क देवुन त्याबदल्यात १५०/- रु व १४,३००/- रक्कम देवुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन त्यानंतर फिर्यादी यांना आरोपी क्र २ व @walker६९७० या लिंकवरील टेलिग्राम युझर टिचर यांनी प्रिपेड टास्क पुर्ण करण्यासाठी वेळोवेळी ११,८५,०००/- रक्कम वेगवेगळे बँक खात्यांवर भरण्यास सांगुन सदर रक्कम फिर्यादी यांना परत न करता सदर |

रकमेचा अपहार करुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- वपोनि बनसोडे ७८७५०७०२३५

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- तळेगाव दाभाडे २९३/२०२४ भादवि कलम ३०६,३२३, ५०४,५०६, ३४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- सन २०२० ते दि.१३/०५/२०२४ रोजीचे दरम्यान .भंडारा दर्शन कॉलनी तळेगाव दाभाडे, पुणे

गुन्हा दाखल :- दि.१५/०५/२०२४ रोजी १६.४७ वा

फिर्यादी :- सौ.योगिता संतोष शेटे वय ४३ वर्ष,धंदा गृहिणी रा. नवलाख उंब्रे,ता.मावळ,जि.पुणे

आरोपी :- १)विराज मोहन अवघडे वय- २४ वर्षे, रा. श्रीरंग विहार, भंडारा दर्षन कॉलनी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे
२)सुवर्णा मोहन अवगडे रा.सदर (सासु)
३)मोहन अवगडे रा. सदर (सासरे)
**आरोपी १ अटक आहे**

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची मयत मुलगी प्रियंका विराज अवगडे,वय २३ वर्ष, हीस तीचे पती आरोपी १ याने शारीरीक व मानसिक त्रास देवुन तसेच आरोपी क्र २ यांनी मानसिक त्रास दिल्यावरुन व सासरे आरोपी ३ यांनी याकडे दुर्लक्ष करुन तिला मानसिक त्रास दिला याकारणास्तव फिर्यादी यांची मयत मुलगी प्रियंका हीला तीचे जगणे नकोसे केले व तीला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याने तीने राहते घरी गळफास घेवुन आत्महत्या केली. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि खामगळ ९५६१०६५८८१

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी ४५७/२०२४ भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि १४/०५/२०२४ रोजी स.०७.०० ते २०.३० वा.चे दरम्यान मलकापुर ते वल्लभनगर पिंपरी पुणे एस.टी. प्रवासा दरम्यान

गुन्हा दाखल :- दि.१५/०५/२०२४ रोजी १५.२२ वा.

फिर्यादी :- महीला फिर्यादी

आरोपी :- अज्ञात इसम

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी या त्याचे पती नामे श्रीधर केशव मोरे यांचेसह मलकापुर ते वल्लभ नगर पिंपरी पुणे असे एस.टी. क्रं. ६४४७ ही मधुन प्रवास करीत असताना त्यांनी त्यांची लेदरची बॅग सीट खाली ठेवली असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने कशाचे तरी सहाय्याने कापुन बॅगमधील एकुण २,०५,००० /- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने फिर्यादी यांच्या समंतीशिवाय लबाडीच्या इराद्याने चोरी करुन नेले आहे.हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोफौ देशमुख ९६८९९१७८९८

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- शिरगाव १४८/२०२४ भादवी कलम २७९ ३३७ ३३८ ३०४ (अ)मो.वा. कायदा.१८४ १३४ (१) (२)१७७

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१४/०५/२०२४ रोजी २१/१० वा. चे सु।। मौजे परंदवडी गावच्या हद्दीत परंदवडी ते सोमाटणे फाटयाकडे जाणारे एक्सप्रेस हायवेचे परंदवडी ओव्हर ब्रिजवर

गुन्हा दाखल :- दि.१५/०५/२०२४ रोजी ०४.३२ वा

फिर्यादी :- शकुर मुबारक शेख वय ३६ वर्षे धंदा हॉटेल व्यवसाय रा. ०६/१८ तुकाराम नगर तळेगाव दाभाडे ता.मावळ जि.पुणे

आरोपी :- टाटा ट्रक क्र. के.ए.२७ ए.४६०४ यावरील चालक

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी परंदवडी ते सोमाटणे फाटयाकडे जाणारे एक्सप्रेस हायवेचे परंदवडी ओव्हर ब्रिजवर फिर्यादी यांचा मित्र परंदवडी येथील कुरेशी मटण शॉपमध्ये काम करणारा नामे रियाज अहमद मुख्तार कुरेशी वय

४४ वर्षे रा. परवेज असलम कुरेशी यांचे रुममध्ये शितळानगर जामा मस्जिद जवळ मामुर्डी देहुरोड ता.हवेली जि.पुणे हा त्याचे मालकाची टीव्हीएस ज्युपिटर मोटार सायकल नं. एम.एच १४ के.पी.७८६५ हिचेवरून घरी जात असताना त्याचे मोटार सायकलीस पाठीमागुन येणारे टाटा ट्रक क्र. के.ए.२७ ए.४६०४ यावरील चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने अविचाराने रस्त्याचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करून निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन पाठीमागुन धडक देउन अपघात करून अपघातात रियाज अहमद मुख्तार कुरेशी याच्या गंभीर व किरकोळ दुखापतीस व मृत्युस कारणीभुत होउन अपघात ठिकाणी न थांबता निघुन गेला आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि लोहेकर

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ६१२/२०२४, भा.दं.वि. कलम ४१९, ४२०, ३४ सह माहीती तंत्रज्ञान अधिनियम (सुधारीत) कायदा २००८ चे कलम ६६ (डी) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि .३१/०३/२०२४ रोजी दु. १२.०० वा. ते दि.०८/०५/२०२४ वा.१७.००चे दरम्यान सी विंग २०६,रॉयल कोर्ट अपार्टमेंट, डांगे चौक, थेरगांव, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि. १५ /०५/२०२४ रोजी १५/४७ वा |
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी धंदा –नोकरी रा.सी विंग २०६,रॉयल कोर्ट अपार्टमेंट, डांगे चौक, थेरगांव, पुणे |
| आरोपी | :- | १)ट्रेसी मोबाईल क्र. ००१३६५७८०७४१६,व्हॉट्सअप मोबाईल नं.९९३७३०४१४६,८५२४०९२५५८, ९४८१४८५९४९, ८२७७६४१९०८, ८७६२१४४२०८ धारक.<br>२)व्हॉटसअप ग्रुप ग८-Vanguard Group, Globe Capital-M58, Globe Capital-M58, M58-Globe Capital Customer Care ग्रुप ॲडमीन धारक<br>३)Globeclss.pro ॲप<br>अकाउंड नंबर धारक व तपासात निष्पन्न होणारे अज्ञात इसम. |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपीत यांनी संगनमत करून लिंक पाठवुन व फिर्यादी यांना वेगवेगळया व्हॉटसअप ग्रुपवर जॉईन करून त्यांचे Globeclss.pro हे ॲपवर अकाऊंट सुरु करण्यास भाग पाडुन त्यावर फिर्यादीला शेअर मार्केटचे वेगवेगळया कंपन्याचे स्टॉकबाबत माहीती देवुन त्यावर चांगला फायदा असल्याचे अमीष दाखवुन तसेच फिर्यादीला चांगला फायदा मिळत असल्याचे त्यांचे ॲपवर दाखवुन फिर्यादीला त्यांनी दिलेले वेगवेगळया बँकेचे अकाऊंटवर एकुण २९,३८,३०१/- रुपये भरण्यास भाग पाडले व त्यानंतर आयपीओची लॉटरी लागली असल्याचे आणखी ३८ लाख रुपये भरल्यास अकाऊंट अनफ्रिज करण्यात येईल असे सांगुन सदर रक्कम भरु शकत नसल्याची व फिर्यादींनी भरलेली रक्कम परत करण्याची त्यांना वारंवार विनंती केली असता त्यांनी सदर अकाऊंट अनफ्रिज न करता फिर्यादीची भरलेली रक्कम परत न करता फिर्यादीचा सदर रक्कमेचा अपहार करुन फिर्यादीची फसवणुक केली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि नाळे ९०१११८१९९९ |

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी ४५९/२०२४ भा.दं.वि.कलम४२०,१७० प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ०६/०५/२०२४ रोजी १६/००वा च्या सुमा. नेपाळी मार्केट शेजारी, पिंपरी पुलाजवळ, पिंपरी, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१५/०५/२०२४ रोजी १७.५७ वा |
| फिर्यादी | :- | सोहेल गुलफाम खान, वय- २३, व्यवसाय- नोकरी, सध्या रा. अक्षय चंदन सोसायटी, तुळजाई कॉलनी, गल्ली नं. ३ थेरगांव, पुणे |
| आरोपी | :- | दोन अनोळखी इसम |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्यांचे मित्र अखिलेश कुवार व जमेशद खान असे रिक्षाने पिंपरी पुलाजवळ कपडे खरेदी करण्यासाठी आले असता त्यांनी नेपाळी मार्केट पिंपरी पुलाजवळ आले त्यावेळी फिर्यादी यांचे जवळ एका मोटार सायकलवर दोन अनोळखी व्यक्ती आले व म्हणाले की, आम्ही क्राईम ब्रॅन्चचे पोलीस आहोत तुमच्याकडे गांजा आहे तुम्ही गांजाची विक्री करता तुमच्या खिशामध्ये गांजा आहे तुमच्या खिशातील सर्व |

साहीत्य बाहेर काढा असे म्हणाले त्यावेळी फिर्यादी यांनी घाबरुन त्यांचे खिशातील सर्व साहीत्य बाहेर काढले त्यामध्ये फिर्यादी यांचेकडे १३,०००/- रुपये, आधार कार्ड व पॅनकार्ड तसेच फिर्यादी यांचा मित्र अखिलेश याचे कडे १०,०००/- व जमशेद खान याचेकडे १०,०००/- रुपये असे पैसे व साहीत्य होते. मोटार सायकलवर आलेल्या त्या दोन लोकांनी फिर्यादी व त्यांचे मित्राकडील एकुण ३३,०००/- रुपये व फिर्यादी यांचे आधार कार्ड घेवुन गेले.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- श्रेणी पोउपनि भांडवलकर ९८२२९८१८१८